नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त १९५८ – ५९

तिसऱ्या नाट्यमहोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी भाषण करीत असतांना मुंबईराज्याचे मुख्यमंत्री माननीय श्री यशवंतराव चव्हाण.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ १९५८ - १९५९ चे वार्षिक कार्यवृत्त

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

प्रा. या. मु. पाठक

विदर्भ साहित्य संमेलनाच्या
तळोधी येथील २१ व्या
अधिवेशनाचे अध्यक्ष.

★

★

नव-निर्वाचित संघाध्यक्ष
१९५९ – ६२

श्री ना. रा. शेंडे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ

१९५८–५९ चे वार्षिक कार्यवृत्त

(टीप--हे कार्यवृत्त १९५३ मध्ये वि. सा. संघाने सुचविलेल्या शुद्धलेखनाच्या नियमांप्रमाणे छापले आहे.)

१ प्रास्ताविक

घटनेप्रमाणे वि. सा. संघाचे नवीन वर्ष १ एप्रिल १९५८ पासून सुरू झाले. ह्या वर्षी साधारण सभेच्या दोन, नवीन कार्यकारी मंडळाची एक व जुन्या कार्यकारी मंडळाच्या सहा बैठकी झाल्या.

१९५८-५९ मधील विशेष कार्य म्हणून पुढील कार्याचा उल्लेख करता येईल. १. धनवटे रंगमंदिर–संपूर्ण मुम्बई राज्यांत अव्वल दर्जाच्या व आधुनिक साधनांनी सुसज्ज अशा नाटचगृहाचे ३ लक्ष रुपयांचे बांधकाम ह्यावर्षी पूर्ण करण्यात आले. २. महाराष्ट्रस्त्रीजीवनदर्शन नावाचा अभिनव कार्यक्रम यंदा आयोजित करण्यांत आला. ३. कै. डॉ. तु. ज. केदार यांनी लिहिलेला The Vedasthan or the Ancient Home of the Indo-Aryans हा संशोधनात्मक प्रबंध ह्यावर्षी प्रकाशित करण्यात आला. ४. विदर्भातील ज्येष्ठ साहित्यिक इतिहाससंशोधक डॉ. य. खु. देशपांडे, कविवर्य-श्री. आनंदराव टेकाडे व कादंबरीकार श्री. वा. सं. गडकरी यांचा सत्कार करण्यात आला. ५. वाशीम, तळोधी, वणी व वर्धा या गावीं वि. सा. संघाच्या शाखा स्थापन करण्यात आल्या.

२ सभासद

चालू वर्षी वि. सा. संघाचे एकूण १४५९ सभासद होते. त्यात एकूण १७३ आजीव सभासद असून त्यांपैकी ५ उपकर्ते, ८ आश्रयदाते, २ साहाय्यक व ३ हितचिंतक आहेत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

३ समित्यांचे कार्य

विदर्भ साहित्य संघाचे कार्य प्रामुख्याने भिन्नभिन्न समित्यांच्या द्वारे चालते. चालू वर्षी निरनिराळ्या समित्यांनी पुढीलप्रमाणे अतिशय उत्साहपूर्वक कार्य केले आहे.

(१) सांस्कृतिक कार्यक्रम समिति--(आमंत्रक-श्री. य. गो. मालोदे)

१. दि. १३-४-५८ ला लंडन येथील केसरीचे वातमीदार श्री. द. वि. ताम्हनकर यांचे 'लो. टिळक व झाशीची राणी लक्ष्मीबाई' या विषयावर डॉ. ना. भा. खरे यांचे अध्यक्षतेखाली व्याख्यान.

२. दि. २९-४-५८ रोजी सांगली येथील विलिंग्डन कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. रं. श्री. मुगळी यांचे 'भारतीय साहित्यातील एकता' या विषयावर भाषण.

३. दि. २१-५-५८ रोजी कै. बाळशास्त्री-जांभेकर-पुण्यतिथीनिमित्त प्रा. सु. म. डोळके यांचे व्याख्यान.

४. स्वातंत्र्यवीर बॅ. वि. दा. सावरकर यांच्या अमृतोत्सवानिमित्त दि. १८-५-५८ ला प्राचार्य डॉ. वि. भि. कोलते, प्रा. भ. श्री. पंडित, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर व श्री. द. रा. गोमकाळे यांची भाषणे, व दि. २९-५-५८ ला म. म. वा. वि. मिराशी यांचे अध्यक्षतेखाली प्रा. श्री. भा. वर्णेकर यांचे 'श्रीविनायकवैजयंती अर्थात् सावरकरचरितम्' या संस्कृत काव्याचे वाचन.

५. दि. १-६-५८ ला नाट्याचार्य कै. श्री. कृ. कोल्हटकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्री. भा. वि. (मामा) वरेरकर यांचे भाषण, सौ. शांताबाई अण्णिगेरी यांचे नाट्यगीतगायन व रंजन कलामंडळातर्फे 'वधूपरीक्षा' नाटकातील काही प्रवेशांचा नाट्यप्रयोग.

६. दि. ५-६-५८ ला कै. वीर वामनराव जोशी पुण्यतिथीनिमित्त प्रा. भ. श्री. पंडित यांचे व्याख्यान.

७. दि. १८-६-५८ रोजी कविकुलगुरु-कालिदास-स्मृतिदिनानिमित्त 'आषाढस्य प्रथम दिवसे' या कार्यक्रमात श्री. ल. रा. कुळकर्णी यांचे अध्यक्षतेखाली श्री. चंद्रशेखर गुप्ते यांचे स्वकृत कालिदास-खंडकाव्याचे वाचन.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

८. दि. २-७-५८ ला 'महर्षि व्यास यांची इतिहास व पुराणविषयक कामगिरी' या विषयावर साहित्याचार्य श्री. बाळशास्त्री हरदास यांचे व्याख्यान.

९. दि. ७-७-५८ ला लो. टिळकजयंतीनिमित्त जनसंघाचे महामंत्री पं. दीनदयाल उपाध्याय यांचे 'लोकमान्य टिळकांचे जीवितकार्य' या विषयावर व्याख्यान.

१०. दि. १-८-५८ ला लो. टिळकपुण्यतिथीनिमित्त श्री. न. वि. तथा काकासाहेब गाडगीळ यांचे भाषण.

११. दि. १३-८-५८ ला कवि 'बी' यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रा. म. श्री. पंडित यांचे भाषण.

१२. दि. २७-८-५८ ला तर्कतीर्थ पं. रघुनाथशास्त्री कोकजे यांचे 'भारतीय घटनेतील धर्मस्वातंत्र्य' या विषयावर व्याख्यान.

१३. दि. ६-९-५८ ला नाट्याचार्य कृ. खाडिलकर यांच्या पुण्यतिथी-निमित्त प्रा. माणिक के. वैंतुले यांचे भाषण व कु. मीरा साठे यांचे नाट्यगीतगायन.

१४. **श्रीसरस्वत्युत्सव**—सतत आठ दिवस चाललेल्या ह्या उत्सवात पुढील कार्यक्रम झाले.

(१) दि. १७-१०-५८ ला श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या हस्ते उद्घाटन.

(२) दि. १८-१०-५८ ला **परिसंवाद**. विषय—गेल्या दहा वर्षातील मराठी वाङ्मय. अध्यक्ष—श्री. मा. ज. कानेटकर. उपविषय व वक्ते:—कादंबरी—प्रा. सु. म. डोळके, नाट्य—श्री. पु. व्यं. दारव्हेकर, नवकथा—श्री. ना. रा. शेंडे, काव्य:—प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोध.

(३) दि. १९-१०-५८ ला **कविसंमेलन**. अध्यक्ष—प्रा. म. श्री. पंडित. कवि—श्री. ना. रा. शेंडे, प्रा. व. कृ. वऱ्हाडपांडे, सौ. उषाताई लिमये, सौ. प्रमिला भागवत, श्री. मु. वि. नेरकर, श्री. पराडकर, श्री. वि. शा. अंजनकर, श्री. वा. रा. पाठक, श्री. ह. वि. पळणीटकर, श्री. द. उकंडे, श्री. स. मा. मुरार, श्री.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उघडे, श्री. दत्ता कुळकर्णी, श्री. बाळ पुट्टेवार, सौ. अनुराधा परांडे व श्री. प्रभाकर नेने.

(४) दि. २२-१०-५८ ला प्रा. श्री. भा. वर्णेकर यांच्या 'श्रीरामकृष्ण चरित्रा' चे काव्यवाचन.

(५) दि. २३ ते २७-१०-५८ पर्यंत ह. भ. प. श्री. सोनोपंत दांडेकर यांची व्याख्यानमाला. विषय—वारकरी पंथाचे महाराष्ट्रावर झालेले परिणाम.

(६) दि. २७-१०-५८ ला रात्री ह. भ. प. श्री. सोनोपंत दांडेकर यांचे वारकरी पद्धतीचे कीर्तन.

१५. **महाराष्ट्र-स्त्रीजीवनदर्शन**—मराठी स्त्रीच्या जीवनातील सर्व वैशिष्टयांचे नाटयाभिनयाच्या द्वारा दर्शन घडविणारा हा अभिनव कार्यक्रम दि. ३०-११-५८ ला करण्यात आला. सडारांगोळीपासून भराडी गौर, हरतालिका, दीपावली ह्या सणांपर्यंत आणि वाकडा झिम्मा, आगोटापागोटा, पिंगा, कोंबडा, हादगा इ. खेळापर्यंत अनेक प्रसंगांचे उत्कृष्ट दर्शन ह्या कार्यक्रमातून घडविण्यात आले. सौ. ताराबाई चाटी व सौ. ताराबाई शास्त्री यांनी ह्या कार्यक्रमाची आखणी केली व त्यात आबालवृद्ध व सर्व थरांतील जवळजवळ ५० भगिनींनी भाग घेतला.

१६. दि. ८-१२-५८ ला श्रीज्ञानेश्वर-पुण्यतिथीनिमित्त ह. भ. प. निजामपूरकर यांचे प्रवचन.

१७. दि. १९-१-५९ ला. कै. प्रा. ना. के. बेहेरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त संघाध्यक्ष श्री. पुरुषोत्तम दि. ढवळे यांचे भाषण.

१८. **वसंत व्याख्यानमाला**—दि. ११ ते २३-३-५९ पर्यंत साहित्याचार्य श्री. बाळशास्त्री हरदास यांची 'महाभारताचा अधिनायक—भगवान श्रीकृष्ण' या विषयावर दहा व्याख्याने झाली. तिकिटे असूनहि व्याख्यानांना श्रोत्यांची अलोट गर्दी होत असे.

१९. दि. २०-३-५९ ला अमेरिकेतील प्रख्यात इतिहासशास्त्रज्ञ व राज्यशास्त्रज्ञ प्रा. डॉ. रिचर्ड एन्. करंट यांचे 'अब्राहम लिंकन व त्याचे जागतिक घडामोडींवर झालेले परिणाम' ह्या विषयावर व्याख्यान.

२०. दि. ३०-३-५९ ला राष्ट्रीय कवि कै. विनायक यांच्या ५० व्या स्मृति-

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दिनानिमित्त प्रा. या. मु. पाठक यांच्या अध्यक्षतेखाली श्री. र. वि. कुलकर्णी व श्री. वसंतराव देशमुख यांची भाषणे

(२) केदार-ग्रंथविषयक समिति—(आमंत्रक प्रा. श्री. गो. काशीकर)

नागपूर विद्यापीठाचे भूतपूर्व कुलगुरु व प्रख्यात कायदेपंडित कै. डॉ. तु. ज. केदार यांनी लिहिलेल्या 'दि वेदस्थान ऑर दि एन्शियन्ट होम ऑफ दि इन्डोआर्यनस्' ह्या संशोधनात्मक प्रबंधाचे प्रकाशन यावर्षी करण्यात आले. ह्या ग्रंथाची हस्तलिखिते व आर्थिक साहाय्य श्रीमती माईसाहेब केदार यांनी दिले व प्रा. डॉ. वि. वा. करंबेळकर यांनी ग्रंथाचे संपादन केले.

(३) कै. गडकरी स्मारक समिति—(कार्यवाह-श्री. पां. वा. गडकरी)

यंदा कै. राम गणेश गडकरी यांचा ४० वा स्मृतिदिन दि. २२ ते २५-१-५९ पर्यंत साजरा करण्यात आला. ह्यानिमित्त पुढील कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

१. दि. २२-१-५९ ला प्राचार्य डॉ. वि. भि. कोलते यांचे अध्यक्षतेखाली बॅ. पां. ना. कारेकार यांचे 'कै. गडकरी यांचे वाङ्मय व जीवन' ह्या विषयावर निबंधवाचन. (हा निबंध आता पुस्तिकारूपाने छापण्यांत आला आहे.)

२. दि. २३-१-५९ ला कै. रा. ग. गडकरी यांच्या प्रतिमेचे पूजन व आचार्य प्र. के. अत्रे यांचे भाषण.

३. दि. २५-१-५९ ला सावनेर मुक्कामी जाऊन कै. गडकरी यांना त्यांच्या निवासस्थानी व दहनभूमीवर श्रद्धांजलि अर्पण करण्यात आली. ह्यावेळी प्राचार्य डॉ. भा. रा. ढेकणे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. वि. भि. कोलते, डॉ. एन. ए. देशमुख, श्री. मधुसूदन गाडगे, डॉ. राजे व प्रा. श्री. गो. काशीकर यांची भाषणे झाली. डॉ. आदमने यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. ह्याच वेळी कै. गडकरी यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत म्हणून रु. ५१ पाठविण्यात आले.

(४) युगवाणी समिति—(संपादक-प्रा. पां. कृ. सावळापूरकर)

युगवाणी मासिकाचे प्रस्तुत वर्षी १२ अंक काढण्यात आले. त्यांपैकी दोन जोडअंक होते. नाटचमहोत्सव विशेषांक व कथाकाव्यविशेषांक ही ह्या वर्षीची विशेष आकर्षणे होती. ह्याशिवाय साहित्य, संस्कृति व

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संशोधन ह्या विषयांवर विविध प्रकारचे अभ्यासपूर्ण लिखाण प्रसिद्ध करण्यांत आले.

(५) परीक्षा समिति—(संचालक-श्री. रा. पु. सगदेव)

अमराठी भाषिकांना मराठीची ओळख करून देण्यापासून एम्. ए. समकक्ष पारंगत परीक्षेपर्यंत विविध परीक्षा दरवर्षी दोनदा घेण्यात येतात. ह्या परीक्षांना शासनाने मान्यता दिली आहे. प्रस्तुत वर्षी निरनिराळ्या परीक्षांना पुढीलप्रमाणे विद्यार्थी बसले.

	सप्टेंबर १९५८ चे सत्र परीक्षा केन्द्रे–२६.		फेब्रु. मार्च १९५९ चे सत्र परीक्षा केंद्रे–३८	
परीक्षा	एकूण विद्यार्थी	उत्तीर्ण	एकूण विद्यार्थी	उत्तीर्ण
प्रवेश	८४	७८	५८	४२
प्रारंभ.	१८२	१५१	२६९	१८६
साहित्य विनीत	३२३	२८८	४०३	३३८
साहित्य परिचित	५३	४६	६२	३६
साहित्य स्नातक	२८	१४	३६	१५
साहित्य पारंगत	३	२	५	१

विनीत परीक्षेत सप्टेंबर सत्रात प्रथम क्रमांक आल्याबद्दल कु. प्रभा रा. तांबे, अमरावती ह्यांना व फेब्रुवारी सत्रात प्रथम क्रमांक आल्याबद्दल श्री. प्रल्हाद हरि खोकले, देऊळगाव माळी यांना कै. प्रा. ना. कृ. दिवाणजी पारितोषिक देण्यात आले.

(६) नाट्यसमिति—आमंत्रक-(श्री. विनयकुमार काटे)

१. दरवर्षीप्रमाणे प्रस्तुतवर्षीहि महाविद्यालयांसाठी श्री. खोलकुटे रौप्यढाल नाट्यस्पर्धा आयोजित करण्यात आली. ह्या स्पर्धेत आयुर्विज्ञान महाविद्यालय, नागपूर विजयी होऊन त्यास रौप्यढाल अर्पण करण्याचा समारंभ दि. १६–७–५८ रोजी डॉ. भवानीशंकर नियोगी यांचे हस्ते आयोजित करण्यात आला.

२. दि. ५–११–५८ ला श्री. शं. ना. सहस्रबुद्धे यांचे मराठी रंगभूमि दिनानिमित्त 'आधुनिक मराठी रंगभूमि' या विषयावर व्याख्यान झाले.

(७) नाट्यमहोत्सव समिति—(आमंत्रक-श्री. श्री. गु. अण्णिगेरी.)

विदर्भ साहित्य संघाचा तिसरा व नागपुरातील दुसरा नाट्यमहोत्सव धनवटे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रंगमंदिरात दि. ७ ते १२–१–५९ पर्यंत साजरा करण्यात आला. ह्या महोत्सवात पुढील कार्यक्रम झाले.

१. दि. ७–१–५९ ला माननीय मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते नाटचमहोत्सवाचे उद्घाटन व त्यानंतर सौ. सुमतिबाई धनवटे लिखित 'संगीत धुळीचे कण' या नाटकाचा प्रयोग. सादरकर्तेः— जयविजय प्रकाशन, मुंबई.

२. दि. ८–१–५९ ला 'संगीत सौभद्र.' सादरकर्ते–साई रंगमंच, मुंबई.

३. दि. ९–१–५९ ला 'संगीत संशयकल्लोळ.' सादरकर्ते–प्रभा नाटचमंडळ, मुंबई.

४. दि. १०–१–५९ ला 'संगीत मानापमान'. सादरकर्ते–साई रंगमंच, मुंबई.

५. दि. ११–१–५९ ला 'तोतयाचें बंड'. सादरकर्ते–धरमपेठ नाटचमंडळ, नागपूर.

६. दि. १२–१–५९ ला 'तुझे आहे तुजपाशी'. सादरकर्ते–नागपूर नाटच-मंडळ व यशवंत कलाकेन्द्र, नागपूर.

या नाटचमहोत्सापासून खर्च वजा जाता रु. ३९५८.४७ चे उत्पन्न झाले.

(८) **रंगमंदिर समिति**— (आमंत्रक–दि. १–५–५८ पर्यंत कै. नाना जोग व नंतर श्री. श्री. गु. अण्णिगेरी.)

१. रंगमंदिराच्या मदतीकरितां नागपूर नाटचमंडळ व यशवंत कलाकेन्द्र यांच्या वतीने दि. १२ ते १५–४–५९ पर्यंत श्री. पु. ल. देशपांडे लिखित 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकाचे पाच प्रयोग करण्यात आले. प्रयोग अत्यंत लोकप्रिय झाले.

२. रंगमंदिराचे कल्पक व त्यासाठी अहर्निश झटणारे श्री. नानासाहेब जोग यांचा दि. १–५–५८ ला आकस्मिक मृत्यु झाला. त्या निमित्त दि. २–५–५८ ला शोकसभा होऊन तीत श्री. बाळासाहेब ढवळे, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, डॉ. वि. भि. कोलते, श्री. ह. ना. वैद्य, श्री. ना. रा. शेंडे, श्री. दे. गो. लांडगे, श्री. बापूसाहेब नाईक, श्री. पु. त्र्यं. दारव्हेकर, श्री. पां. बा. गडकरी, श्री. य. गो. मालोदे व प्रा. श्री. गो. काशीकर यांनी कै. नानासाहेब जोगांस श्रद्धांजलि अर्पण केली.

३. **धनवटे रंगमंदिराचे उद्घाटन**—रंगमंदिर उभारण्याचे विदर्भ साहित्य संघाचे स्वप्न ह्यावर्षी साकार झाले. ह्या कामासाठी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नागपूरच्या उदार व धनिक धनवटे कुटुंबियांकडून व मुंबई शासनाकडून आर्थिक साहाय्य मिळाले. एकूण तीन लाख रुपयांचे अद्ययावत् व भव्य नाट्यगृह बांधले गेले असून त्याचे उद्‌घाटन दि.२९-११-५८ ला मुंबई राज्याचे मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांनी केले. त्याच दिवशी रात्री कै. नाना जोग लिखित 'सोन्याचे देव' ह्या नाटकाचा प्रयोग नागपूर नाट्य मंडळातर्फे करण्यात आला. हा प्रयोग सर्व सभासदांना व निमंत्रितांना निःशुल्क दाखविण्यात आला. 'असे उत्कृष्ट नाट्यगृह मुंबई राज्यात अन्यत्र कोठेहि नाही' असे प्रशंसोद्‌गार मुख्यमंत्री श्री. चव्हाण यांनी उद्‌घाटनाचे वेळी काढले.

(९) **पुस्तकालय समिति**—(आमंत्रक श्री. ल. वि. पांढरीपांडे)

१. या वर्षी रोज सकाळी मोफत वाचनालय चालविण्यात आले.

२. कै. हरिभाऊ नेने ह्यांचा अमोल ग्रंथसंग्रह नेने कुटुंबियांनी विदर्भ साहित्य संघास देणगी म्हणून दिला.

३. पुस्तकालयाकरिता नवीन कपाटे तयार करून यंदा पुस्तकालयाचा विस्तार वाढविण्यात आला.

(१०) **माननीयांच्या भेटी**—ह्या वर्षी पुढील सद्‌गृहस्थांनी वि. सा. संघाला भेटी देऊन संघकार्याबद्दल प्रशंसोद्‌गार काढले.

१. दि. १५-६-५८—नामदार श्री. ना. खं. ऊर्फ बाळासाहेब तिरपुडे, समाज कल्याण मंत्री, मुंबई.

२. दि. ३१-७-५८—मुंबई राज्याच्या शिक्षण विभागाचे उपसचिव श्री. सेतुमाधवराव पगडी.

३. दि. ३१-७-५८—श्रीमान् बाबासाहेब खापर्डे, अमरावती.

४. दि. १३-८-५८—मुंबई राज्य नाट्य महोत्सव समितीचे चिटणीस श्री. नरहरी भट.

५. दि. १४-८-५८—परमश्रेष्ठ राज्यपाल श्री. श्रीप्रकाश.

६. दि. १७-८-५८—संगीतचूडामणि श्री. विनायकराव पटवर्धन.

७. दि. ४-११-५८—दक्षिण महिला परिषदेच्या अध्यक्ष श्रीमती लीला मस्तकार-रेळे.

८. दि. १८-१२-५८—श्री. अनंत काणेकर.

९. दि. २४-१२-५८—श्री. धनंजयराव गाडगीळ.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१०. दि. २५-१२-५८—पश्चिम महाराष्ट्रातील श्री. केळुसकर प्रभृति पत्रकारवृंद.

११. दि. ३१-१-५९—सुप्रसिद्ध कवि श्री. ग. दि. माडगुळकर आणि " धुळीचे कण " नाटकातील कलाकार.

१२. दि. १५-१-५९—श्री. नानासाहेब गोरे व श्री. दि. वि. काळे.

१३. दि. १९-१-५९—श्री. र. के. खाडिलकर.

१४. दि. २४-१-५९—श्री. जयंतराव टिळक, श्री. एस्. एम्. जोशी व श्री. ल. मा. पाटील.

१५. दि. २६-२-५९—सुप्रसिद्ध कवि सर्वश्री सोपानदेव चौधरी, ना. घ. देशपांडे, बा. भ. बोरकर, राम शेवाळकर, सौ. संजीवनी मराठे व वसंत बापट.

१६. दि. २७-२-५९—राजकवि यशवंत.

(११) अन्य कार्यक्रम—१. दि. १५-९-५८ ला कै. प्रा. **ना. के. बेहेरे यांच्या तैलचित्राचा अनावरण समारंभ** न्या. मू. श्री. के. तु. मंगळमूर्ती यांचे अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी डॉ. वि. भि. कोलते, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. ना. रा. शेंडे व श्री. बाळासाहेब ढवळे यांची भाषणे झाली व सौ. अभ्यंकर यांनी कै. बेहेरे यांच्या काही कवितांचे गायन केले.

२. दि. ४-१०-५८ रोजी समाजकल्याण मंत्री मा. ना. खं. तिरपुडे यांच्या हस्तें **कै. व्यं. वि. कोठेकर यांच्या तैलचित्राचे अनावरण** करण्यात आले. यावेळी श्री. ल. वि. पांढरीपांडे, श्री. ढवळे, श्री. अण्णिगेरी व श्री. बाळासाहेब कोठेकर यांची भाषणे झाली. याचवेळी कै. कोठेकर सभागृहाचे उद्‌घाटनहि करण्यात आले. श्री. बाळासाहेब कोठेकर यांनी दिलेल्या रु. २५०१ देणगीतून हे सभागृह बांधण्यात आले.

३. दि. १६-४-५८ ला. प्रा. अ. ना. देशपांडे यांचा " आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास " हा ग्रंथ लिहिल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा. पां. कृ. सावळापूरकर, प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोध, प्रा. या. मु. पाठक व प्रा. सुरेश डोळके यांची भाषणे झाली.

४. दि. १६-९-५८ ला आचार्य प्र. के. अत्रे यांचा षष्टयब्दिपूर्तीनिमित्त सत्कार करण्यांत आला.

५. **ज्येष्ठ साहित्यिकांचा सत्कार**—दि. २१-९-५८ रोजी इतिहास-संशोधक डॉ. य. खु. देशपांडे, कविवर्य श्री. आनंदराव कृष्णाजी टेकाडे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

व कादंबरीकार श्री. बाळकृष्ण संतुराम गडकरी यांचा सत्कारसमारंभ लोकनायक बापूजी अणे यांचे अध्यक्षतेखाली करण्यात येऊन या तिघांनाहि शाल व श्री–फल अर्पण करण्यांत आले. यावेळी म. म. वा. वि. मिराशी, डॉ. वि. भि. कोलते, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, प्रा. भ. श्री. पंडित व श्री. बाळासाहेब ढवळे यांनी गौरवपर भाषणे केली.

६. दि. ११–२–५९ रोजीं डॉ. खरे व डॉ. केदार यांचे चरित्रलेखक श्री. ज. रा. जोशी यांचा डॉ. य. खु. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार करण्यात आला. यावेळी श्री. र. वि. कुळकर्णी, श्री. कात्यायन, प्रा. काशीकर, प्रा. डोळके व डॉ. ना. भा. खरे यांची भाषणे झाली.

(१२) **वि. सा. संघाचे शाखासंमेलन**—दि. २०–४–५८ रोजी वि. सा. संघाच्या शाखांचे संमेलन खामगाव येथे भरविण्यांत आले. यावेळी अमरावती, रामटेक, गोंदिया, खामगाव या शाखांचे व केंद्र कार्यालयाचे पदाधिकारी उपस्थित होते.

(१३) **शाखास्थापनेचे कार्य**—यावर्षी वाशीम, तळोधी, वणी व वर्धा येथे नवीन शाखा स्थापन झाल्या असून मेहेकर व अकोला येथे शाखा स्थापन करण्याची पूर्वतयारी झाली आहे.

(१४) **शाखांचे कार्यक्रम—१. हिंगणघाट**—हिंगणघाट शाखेला दि. १३–३–५८ रोजी सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर यांनी भेट दिली व तेथील कार्यकर्त्यांशी विचारविनिमय केला.

२. **अमरावती**—दि. २८–५–५८ ला स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अमृत महोत्सव श्री. काकासाहेब पेंढारकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. यावेळी कविभूषण प्रा. अण्णासाहेब खापर्डे व श्री. के. डी. देशपांडे यांची भाषणे झाली व त्यानंतर काव्यगायनाचा कार्यक्रम झाला. यात सर्वश्री मधुकर केचे, सुरेश भट, दत्ता कवीश्वर, पद्‌वाड, केदार, गोस्वामी आदि कवींनी भाग घेतला.

३. **चांदा**—दि. ९–८–५८ ला श्री. तु. ना. काटकर यांच्या अध्यक्षतेखाली क्रांतिदिन साजरा करण्यांत आला. यावेळी श्री. बाबुरावजी आवळे, प्रा. भाऊ मांडवकर, श्री. वोधनकर व पं. भगवतीप्रसाद मिश्र यांची भाषणे झाली.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दि. ११-९-५८ ला पं. भगवतीप्रसाद मिश्र यांचे अध्यक्षतेखाली पू. विनोबांची ६४ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी राजवैद्य श्री. अनवाणे, श्री. फडके व सा. भू. काटकर यांची भाषणे झाली.

४. गोंदिया—दि. १-८-५९ रोजी लो. टिळकपुण्यतिथि साजरी करण्यात आली. या वेळी श्री. चतुर्भुजभाई जसानी यांचे अध्यक्षतेखाली श्री. ना. ह. तेलंग वकील यांचे भाषण झाले व त्यानंतर स्थानिक कवींनी काव्य-गायन केले.

दि. २४ ते २६-८-५८ पर्यंत नागपूरच्या जीवनविकास मासिकाचे संपादक स्वामी शिवतत्त्वानंद यांची धर्मजीवन, धर्मसाधना व भगवत्प्राप्तीचा उपाय या विषयांवर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली.

भवभूतिस्मारकाचे बांधकाम यावर्षी चालू होते.

५. खामगाव—कै. श्री. कृ. कोल्हटकर स्मारक नाटचगृहाचे बांधकाम या वर्षी चालू ठेवण्यात आले व त्यात कै. कोल्हटकराचे वाङ्मय ठेवण्याची योजना तयार करण्यात आली.

६. तळोधी—दि. ६-११-५८ ला तळोधी शाखेच्या स्थापनेचा समारंभ श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. या वेळी श्री. बाळासाहेब ढवळे, श्री. मेश्राम, श्री. ना. रा. शेंडे, प्रा. काशीकर व प्रा. गेडाम यांची भाषणे झाली.

वि. सा. संघाचे २१ वें साहित्यसंमेलन यंदा तळोधी येथे भरविण्यात आले. त्याचा वृत्तांत स्वतंत्रपणे दिला आहे.

७. वर्धा—दि. २४-८-५८ ला स्थानिक सभासदांची सभा होऊन तीत शाखास्थापनेचा निर्णय घेण्यात आला.

दि. २८-९-५८ ला श्री. बाळासाहेब हुद्दार यांच्या अध्यक्षतेखाली शाखा स्थापनेचा समारंभ करण्यात आला. यावेळी श्री. ना. रा. शेंडे, प्रा. श्री. गो. काशीकर व श्री. वि. उ. चांदूरकर यांची भाषणे झाली.

श्री. सुधीर फडके यांच्या गीतरामायणाच्या गायनाचा कार्यक्रम शाखेतर्फे घेण्यात आला.

८. वणी—दि. २४-८-५८ ला प्रा. श्री. गो. काशीकर यांनी भेट दिली. या वेळच्या बैठकींत शाखास्थापनेचा निर्णय घेण्यांत आला.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

९. अकोला—दि. १-३-५९ ला स्थानिक सभासदांची बैठक होऊन शाखास्थापनेचा निर्णय घेण्यात आला व श्री. द. रा. गोमकाळे यांच्या अध्यक्षतेखाली अस्थायी समिति स्थापन करण्यात आली.

१०. मेहेकर—शाखास्थापनेची पूर्वतयारी पूर्ण झाली असून शाखा स्थापनेस संमति देण्यांत आली आहे.

(१५) तळोधी येथील २१ वे वि. सा. संमेलन—यंदा २१ वे विदर्भ साहित्य संमेलन तळोधी येथे दि. १५ व १६-३-५९ ला सुप्रसिद्ध कवि प्रा. या. मु. पाठक यांचे अध्यक्षतेखाली अत्यंत उत्साहानें व यशस्वीपणे पार पडले. संमेलनांत पुढील कार्यक्रम झाले.

१. दि. १५-३-५९ ला सकाळी ९ वाजता अधिवेशनास सुरवात झाली. या वेळी स्वागताध्यक्ष श्री. गो. वी. मेश्राम यांचे स्वागतपर भाषण व संमेलनाध्यक्ष प्रा. या. मु. पाठक यांचे अध्यक्षीय भाषण हे मुख्य कार्यक्रम झाले.

२. दुपारी १॥ वाजता प्रथम विषयनियामक समितीची व नंतर साधारण सभेची बैठक झाली.

३. दुपारी ३॥ वाजता प्रा. या. मु. पाठक यांच्या हस्ते संशोधनात्मक व साहित्यिक प्रदर्शनाचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी श्री. दे. गो. लांडगे, श्री. कृ. मु. उजळंबकर व प्रा. श्री. गो. काशीकर यांची भाषणे झाली.

४. सायंकाळी ५ वाजता कै. किसन फागोजी बनसोड लिखित "प्रदीप" या काव्यसंग्रहाचे व कै. डॉ. तु. ज. केदार लिखित "दि वेदस्थान ऑफ दी एनशिएंट होम ऑफ दी इंडोआर्यनस्" या संशोधनात्मक प्रबंधाचे प्रकाशन करण्यात आले. या वेळी श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. ना. रा. शेंडे, श्री. शामराव बंसोड, श्री. बाळासाहेब ढवळे, डॉ. वि. वा. करंबेळकर व श्रीमती रमाबाई केदार यांची भाषणे झाली.

५. सायंकाळी ५॥ वाजता "आधुनिक मराठी कविता" या विषयावर परिसंवाद झाला. यांत प्रा. राम डोके, प्रा. व. कृ. वऱ्हाडपांडे व प्रा. भ. प्र. मोहरीर यांनी भाग घेतला.

६. रात्री ९ वाजता चांदा प्रशिक्षण महाविद्यालयातील कलाकारांनी गायन व माडिया नृत्याचा कार्यक्रम सादर केला.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

७. रात्री ९ वाजता संमेलनात अत्यंत गाजलेल्या कविसंमेलनात प्रा. या. म. पाठक, प्रा. वसंत वऱ्हाडपांडे, प्रा. राम डोके, श्री. वा. रा. कांत, श्री. कृ. मु. उजळंबकर, श्री. तु. ना. काटकर, सौ. उषा लिमये, सौ. प्रमिला भागवत, श्री. वसू भगत, श्री. वसंत सबनीस, श्री. तुळशीराम काजे, श्री. पु. व्यं. दारव्हेकर, प्रा. पद्माकर डावरे, श्री. बाळ पुट्टेवार, श्री. दे. गो. लांडगे, श्री. गंगाधर पानतावणे, श्री. रामानंद, श्री. निमजे, श्री. ना. गं. वझे, कु. दुर्गा कानगो, श्री. वामन पाठक, तळोधी येथील श्री. करमरकर व चांदमिया, श्री. पारळकर, प्रा. बोरसे, श्री. कृष्णाजी दिवाणजी व श्री. वसंत खेडीकर ह्यांनी भाग घेतला.

८. दि. १६-३-५९ रोजी सकाळी नऊ वाजता "आधुनिक मराठी नाटके" ह्या विषयावरील परिसंवादाने कार्यक्रमास सुरवात झाली. परिसंवादात प्रा. भा. श्री. परांजपे, प्रा. प्र. ना. ऊर्ध्वरेषे व श्री. पु. व्यं. दारव्हेकर यांनी भाग घेतला.

९. दुपारी १॥ वाजता परस्पर-परिचयाचा व साहित्यचर्चेचा कार्यक्रम झाला. ह्याच वेळी काही कवींनी सहकारी कवितेचा अभिनव प्रयोग केला.

१०. दुपारी ५॥ वाजता खुले अधिवेशन होऊन त्यात पुढील विषयांसंबंधी एकूण पंधरा ठराव एकमताने संमत करण्यांत आले.

ठराव—१. दिवंगतांबद्दल दुखवटा. २. कै. नाना जोग स्मारकासाठी आर्थिक साहाय्याची विनंती. ३. रामटेक, पद्मपूर व आंभोरा येथे अनुक्रमे कालिदास, भवभूति व मुकुंदराज यांची स्मारके बांधण्याबद्दल मुंबई शासनास विनंती. ४. पुरातत्व विभागाची कचेरी नागपूरला आणल्याबद्दल भारत शासनास धन्यवाद. ५. सीमांवरील मराठी प्रदेश मुंबई राज्यास जोडण्यासंबंधी मागणी. ६. विदर्भ साहित्य संघाने सुचविलेली मराठी लेखन पद्धति सर्वमान्य करण्याबद्दल विनंती. ७. साहित्यिकांना मदत देण्याच्या धोरणाबद्दल मुंबई शासनाचे अभिनंदन. ८. नामवंत साहित्यिकांनी आपल्या ग्रंथांची हस्तलिखिते वि. सा. संघाचे संग्रही देण्याबद्दल विनंती. ९. शासन साहित्य परिषदेचे पुनरुज्जीवन करण्याबद्दल मुंबई शासनास विनंती. १०. विदर्भातील साहित्याची सूचि करण्याबद्दल शासनास मागणी. ११. वाशीम, चांदा इत्यादि गावांची वत्सगुल्म, चंद्रपूर अशी नावे बदलण्यासंबंधी शासनास विनंती. १२. ग्रंथालयविषयक कायदा

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

करण्यासंबंधी मागणी. १४. विदर्भातील लोकभाषा व लोकसाहित्य यांच्या अध्ययनाकरिता योजना करण्यासंबंधी मुंबई शासनास विनंती. १५. विदर्भाकरिता स्वतंत्र पुराणवस्तुविभाग उघडण्याबद्दल व नागपूरचे ऐतिहासिक साहित्य तेथून न हलविण्याबद्दल मागणी.

११. रात्री ९ वाजता सुप्रसिद्ध गायक प्रा. अ. के. कोगजे यांचे शास्त्रोक्त गायन होऊन संमेलन समाप्त झाले.

खेडेगावांत संमेलन भरविण्याचा वि. सा. संघाने यंदा धाडशी प्रयत्न केला व तो अपेक्षेबाहेर यशस्वी झाला. ग्रामीण जनता व साहित्यिक यांचा प्रत्यक्ष संबंध आणण्याची महत्त्वाची कामगिरी ह्या संमेलनाने केली आहे. तसेच ग्रामीण जनतेतहि उत्कृष्ट कवि, रसिक व साहित्य जाणणारे असतात हे ह्या संमेलनाने उत्कृष्टपणे सिद्ध केले आहे.

(१६) त्रैवार्षिक निवडणूक--१९५९ ते १९६२ करिता कार्यकारी मंडळाची त्रैवार्षिक निवडणूक होऊन पुढीलप्रमाणे नवीन कार्यकारी मंडळ अस्तित्वांत आले. अध्यक्ष--श्री. ना. रा. शेंडे, उपाध्यक्ष : श्री. पुरुषोत्तम दि. ढवळे कोषाध्यक्ष : कु. ताराबाई प्रधान, सरचिटणीस : प्रा. श्री. गो. काशीकर, चिटणीस : श्री. य. गो. मालोदे, श्री. तु. ना. काटकर व प्रा. भा. ल. भांबुरकर, सदस्य : श्री. पु. य. देशपांडे, प्रा. या. मु. पाठक, श्री. श्री. द. रा. गोमकाळे, प्रा. राम डोके, सौ. सुमतिबाई घनवटे, श्री. गो. रा. दोडके, प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे, प्रा. मा. ल. व्यवहारे, प्रा. तु. वि. गेडाम, श्री. श्री. ग. पांढरीपांडे, श्री. गो. स. देहाडराय व श्री. बा. का. देशमुख.

निर्वाचनाधिकारी म्हणून श्री. मु. ह. मुंजे व लवाद म्हणून म. म. डॉ. वा. वि. मिराशी यांनी वि. सा. संघास उपकृत केले.

(१७) अनुदान व देणग्या—

१. मुंबईशासन—वार्षिक अनुदान रुपये ७५००-०-०

२. मुंबईशासन—रंगमंदिरासाठी रुपये ९५६५०-०-०

३. शिवराज फाइन आर्ट लिथो वर्कस्, नागपूर—
रंगमंदिरासाठी रुपये ३५०००-०-०

४. श्रीमती यमुनाबाई नेने—पुस्तकालयासाठी कै. ह. ना. नेने यांचा ग्रंथसंग्रह.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

५. श्रीमती रमाबाई केदार—वेदस्थान ग्रंथासाठी रुपये ५००-०-०

६. प्रा. श्री. गो. काशीकर—रुपये १३०-०-०

वि. सा. संघ वरील सर्व देणगीदारांचा अत्यंत आभारी आहे.

(१८) आभार—या वर्षी वि. सा. संघाचे कार्य पार पाडण्यास शेकडो कार्यकर्त्यांचे, दात्याचे, सभासदांचे व संस्थांचे साहाय्य झाले आहे. वि. सा. संघ त्यांचा अत्यंत आभारी आहे. वि. सा. संघाला या पुढेहि सर्वांचे साहाय्य लाभावे ही प्रार्थना आहे.

श्री. गो. काशीकर
सरचिटणीस

पुरुषोत्तम दि. ढवळे
अध्यक्ष
वि. सा. संघ

य. गो. मालोदे
तु. वि. गेडाम
चिटणीस
वि. सा. संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

(१–४–५८ ते ३१–३–५९) ३१ मार्च १९५९ रोजी संपणाऱ्या वर्षाचा जमाखर्चाचा तक्ता

जमा

	रुपये न. पै	रुपये न. पै
आरंभीची शिल्लक		
शिल्लक जवळ	३४–५१	
नाट्यसमिति	२००–००	
ग. स्मा. समिति	३४२–६६	
दि बँक ऑफ महाराष्ट्र (करंट)	२,१८०–८५	
,, (वि. फं.)	१९,४०८–४३	
म. प्र. विदर्भ प्री. को. सोसायटी	२,९९३–९५	
विदर्भ को. ऑ. बँक	४४१–७३	
सरकारी अनुदान	७,५००–००	
मुदती ठेव	३.५००–००	३६,६०२–१३
साधारण सभासद वर्गनी	४,१३१–००	
आजीव ,,	६०५–००	
पुस्तक विक्री	२९३–१५	
व्याज	३४१–५५	
परीक्षाशुल्क	५,३९८–३६	

खर्च

	रुपये न. पै	रुपये न. पै
कार्यालयीन व्यवस्था व शाखासाहाय्य		२०३५–५३
फोन व पोस्टेज		५२२–८५
सस्पेन्स आकौंट		१३०–९९
वेतन खर्च		४,३१०–४६
मुद्रण व स्टेशनरी		६८८–५०
युगवाणी मुद्रण		४,८२५–७४
किरकोळ खर्च		४०४–४७
सांस्कृतिक कार्यक्रम समिति		१,८५५–१५
गडकरी स्मा. समिति		२५३–२४
नाट्य समिति व महोत्सव		८१–१५
अंशदान		२७६–००
वीज खर्च		५९७–३५
परीक्षा समिति	२,४३४–५९	
वजा मागील शिलकेपैकी	६२२–२६	१८,१२–३३

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सांस्कृतिक कार्यक्रम समिति	२,०८१–५०		वस्तु खरेदी	७१६–५१
देणग्या	१४–१०		ऑडीट फी	५०–००
सरकारी अनुदान	७,५००–००		गडकरी ग्रंथालय	२३८–९६
किरकोळ उत्पन्न	८७०–३४		ॲडव्हान्स टू स्टाफ	२५–२०
नाट्य स्पर्धा	१९–५०		मंदिर रचना	१,९८,९१६–१३
युगवाणी वर्गणी	८०–००		डिपॉझिट परत	१३,०००–००
मंदिरनिधि देणग्या, इतर उत्पन्न, भाडे, वगैरे	६१,६६१–३६		मंदिर रचना तात्पुरते कर्ज	९००–००
मंदिरनिधि सरकारी अनुदान	९५,६५०–००		वाहन व प्रवास खर्च	५८०–०२
„ „ डिपॉझिट	३७,५००–००		श्री. अणे तैलचित्र	१५६–००
गडकरी स्मा. समिति	३६–००		जनरल फंड	४४–०१
ग्रंथसंपादन व संशोधन	१,४९५–०६		बँक कमिशन	१२–७७
			आतिथ्य	२७७–४
		२,१७,६७६–९२	शिल्लक	
			बॅलन्स शीट तक्त्याप्रमाणे मुदती ठेवीच्या रकमा मिळून	२१,५६८–६५
एकूण		२,५४,२७९–०५	एकूण	२,५४,२७९–०५

तपासले व ते बरोबर आहेत.

नागपूर
दि. २५ एप्रिल १९५९

महेश्वर जनार्दन गद्रे
महेश्वर गद्रे आणि कंपनी करितां
चार्टर्ड अकाऊंटंट

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

३१ मार्च १९५९ रोजी असलेले 'बॅलन्स शीट'

फंड व लायबिलीटीज

	रु. न.पै.	रु. न.पै.
आजीव सभासद		
मागील बाकी	५,९६७–००	
अधिक यंदाचे	६०५–००	६,५७२–००
मंदिर निधि		
मागील बाकी	९९,९२७–७५	
अधिक यंदाचे	६१,६६१–३६	१,६१,५८९–११
मंदिरनिधि सरकारी अनुदान—		
मागील बाकी	१,०९,६८३–००	
अधिक यंदाचे	९५,६५०–००	२,०५,३३३–००
कै. नेने स्मारक फंड		
मागील बाकी		७५–००
मंदिरनिधि डिपॉझिट		
मागील बाकी	१८,०००–००	
अधिक यंदाचे	३७,५००–००	
	५५,५००–००	

ॲसेटस् व प्रॉपर्टी

	रुपये न. पै.	रुपये न. पै.
टिनशेड व विहिर		
मागील बाकी		५,३४१-८६
इलेट्रिक डिपॉझिट		
मागील बाकी		३३१–००
फर्निचर व इतर सामान		
मागील बाकी	८,०१९–५९	
अधिक यंदाचे	७१६–५१	८,७३६–१०
मंदिर रचना		
मागील बाकी	२,२३,९३५–६२	
अधिक यंदाचे	१,९८,९१६-१३	४,२२,८५१–७५
पुस्तके (गडकरी ग्रंथालय)		
मागील बाकी	९९१–४३	
अधिक यंदाचे	२३८–९६	१२३०–३९

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

डिपॉझिट परत	१३,०००-००	४२,५००-००	ॲडव्हान्स टू स्टाफ		
ससपेन्स अकौंट			मागील बाकी	५०-००	
मागील बाकी	३१४-६५		अधिक यंदाचे	२५-२०	७५-२०
वजा यंदाचे	१३०-९९	१८३-६६	तात्पुरते कर्ज (मंदिर समिति)		९००-००
जनरल फंड			गडकरी तैलचित्र		
मागील बाकी	४१,४०४-२२		मागील बाकी		३००-००
अधिक यंदाचे	३,६७७-९६	४५,०८२-१८	मुदती ठेव		७,०००-००
			शिल्लक जवळ	१०९-१५	
			,, चेक	१००-०	
			दि बँक ऑफ महाराष्ट्र (करंट)	६३६-१४	
			,, ,, ,, बिल्डिंग फंड	२,३६६-२८	
			विदर्भ प्री. को. ऑ. हा. सोसायटी	३,११४-४०	
			नाट्य समिति	२००-००	
			परीक्षा समिति	५४२-६८	
			सरकारी अनुदान	७५००-००	१४,५६८-६५
		४,६१,३३४-९५			४,६१,३३४-९५

प्रमाणपत्र—विदर्भ साहित्य संघ या संस्थेच्या ३१ मार्च १९५९ रोजी तयार असलेल्या बॅलन्सशीटमध्ये वर दिलेले आकडे संघाच्या जमाखर्चाच्या पुस्तकाशी तंतोतंत जुळतात आणि ही पुस्तके आम्ही तपासली असून ती बरोबर आहेत असे प्रमाणपत्र आम्ही देतो. रंगमंदिर समितीचे हिशेब पूर्ण न मिळाल्यामुळे अद्याप तपासलेले नाहीत.

महेश्वर जनार्दन गद्रे
महेश्वर गद्रे आणि कंपनी, चार्टर्ड अकाऊंटटस्
नागपूर दि. २५ एप्रिल १९५९

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

(१-४-१९५८ ते ३१-३-५९) ३१ मार्च १९५९ ला संपणाऱ्या वर्षाच्या आय-व्ययाचा तक्ता

आय	रुपये न. पै.	व्यय	रुपये न. पै.	रुपये न. पै.
साधारण सभासद वर्गणी	४,१३१-००	वेतन		४,३१०-४६
परीक्षा शुल्क	५,३९८-३६	फोन व पोस्टेज		५२२-८५
किळकोळ जमा	९०६-३४	मुद्रण व स्टेशनरी		६८८-५०
इतर देणग्या	१४-१०	युगवाणी मुद्रण		४,८२५-७४
सांस्कृतिक कार्यक्रम समिति	२,०८१-५०	वाहन व प्रवास खर्च		५८०-०२
नाटय स्पर्धा	१९-५०	किरकोळ खर्च		४०४-४७
पुस्तक विक्री	२९३-१५	सांस्कृतिक कार्यक्रम समिति		१,८५५-१५
ठेवीवरील व्याज	३४१-५५	आतिथ्य खर्च		२७७-०४
युगवाणी वर्गणी	८०-००	परीक्षा समिति	२४३४-५९	
		वजा मागील वर्षाची शिल्लक	६२२-२६	१८१२-३३
सरकारी अनुदान	७,५००-००	कार्यालयीन व्यवस्था व शाखा साहाय्य		२,०३५-५३

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रंथसंपादन व संशोधन	१,४९५-०६	वीज खर्च	५९७-३५
		बँक कमिशन	१२-७७
		ऑडिट फी	५०-००
		अंशदान	२७६-००
		गडकरी स्मारक समिति	२५३-२४
		नाट्यसमिति व महोत्सव	८१-१५
			१८५८२-६०
		अेक्सेस ऑफ इन्कम ओव्हर अेक्स्पेंडीचर C/F to B/S	३,६७७-९६
	२२,२६०-५६		२२,२६०-५६

नागपूर तपासले व ते बरोबर आहेत

दि. २५ एप्रिल १९५९ महेश्वर जनार्दन गद्रे

For महेश्वर गद्रे आणि कंपनी, चार्टर्ड अकाउंटंटस्

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्यसंघाचीं प्रकाशनें

	पुस्तक	मूल्य रु. पैसे
★ १	निबंध परिमल	२–२५
२	सुमन संचय	१–२५
३	मराठी गद्य	१–५०
४	अंमलदार (नाटक) पु. ल. देशपांडे	२–००
५	भारती (नाटक) नाना जोग	१–५०
६	हिंदी मराठी भाषा प्रवेशिका–मालतीबाई श्रीखंडे	०–७५
७	कै. हरिभाऊ नेने यांचा संशोधन लेख संग्रह भाग २	३–००
८	The Vedasthana or The Ancient Home of the Indo-Aryans- (पूर्ण ग्रंथ) ले. कै. डॉ. तु. ज. केदार	३–००
	,, ,, (केवळ भाग ४)	१–५०
१०	डॉ. केदार यांचे चरित्र —ले. ज. रा. जोशी	५–००
११	नाट्यमहोत्सव विशेषांक	३–००

कै. गडकरी वाङ्मयावरील प्रबंध

	पुस्तक	मूल्य रु. पैसे
१२	वाग्वैजयंतीचें पुनर्मूल्यन —डॉ. मा. गो. देशमुख	०–३१
१३	नाटककार गडकरी —द. रा. गोमकाळे	०–३१
१४	गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार–कवि भूषण प्रा. अण्णासाहेब खापर्डे	०–५०
१५	गडकऱ्यांच्या नाटकांतील स्वगत —प्रा. श्री. मा. कुळकर्णी	०–५०
१६	मतारीचे नव्हे ! एकतारीचे बोल —श्री. द. त्रि. तेंडूलकर	०–५०
१७	गडकऱ्यांची खरी भूमिका —प्रा. भ. श्री. पंडित	०–५०
१८	गडकऱ्यांचीं नाट्यशैली —प्रा. रू. पां. पाजणकर	०–५०
१९	"युगवाणी मासिक" — वार्षिक वर्गणी रु. ५ (वि. सा. संघाचें मुखपत्र)	

★ ह्या पुस्तकाचे विक्रीचे अधिकार नागपूर प्रकाशन, नागपूर यांचेकडे आहेत.

ह्या पुस्तकांचे विक्रीचे अधिकार ठाकूर आणि कंपनी, नागपूर यांचेकडे आहेत. बाकीचीं सर्व पुस्तकें वि. सा. संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १ ह्या पत्त्यावर मिळतील.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ